पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका.
जावक क्र.Water/1822/2026-2027
दिनांक : २०/०६/२०२६

## कार्यालयीन आदेश

**विषय: भारतीय हवामान विभागाने (IMD) प्रसिद्ध केलेल्या पावसाच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पाणी बचतीसाठी कराव्या लागणा-या उपाययोजनांबाबत.**

भारतीय हवामान विभागाने (IMD) दिनांक २९ मे २०२६ रोजी जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील नैऋत्य मान्सून पावसाचा सुधारित दीर्घकालीन अंदाज प्रसिद्ध केला आहे. या अंदाजानुसार देशातील हंगामी पर्जन्यमान हे दीर्घकालीन सरासरीच्या (LPA) सुमारे ९०% ते ९५% पाउस होण्याची शक्यता २४% टक्के आहे. दरवर्षीप्रमाणे नियमित पावसाची शक्यता १४% आहे. तर ९०% पेक्षा कमी पावसाची शक्यता ६०% आहे. तसेच अल-निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पाणी बचतीसाठी कराव्या लागणा-या उपाययोजनांबाबत खालीलप्रमाणे जबाबदा-या निश्चित करण्यात येत आहेत :

**अ. क्षेत्रिय कार्यालय** - संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त, विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक

१. पाणी कपातीच्या कालावधीत महापालिका हद्दीमधील सार्वजनिक तसेच, खाजगी वॉशिंग सेन्टर्स बंद करणेत यावेत. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामधील वॉशिंग सेन्टर्स बंद असलेबाबत खातरजमा करावी. वॉशिंग सेन्टर्स सुरु केल्यास संबंधितांवर रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.
२. महापालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील मोकादम, आरोग्य निरीक्षक, विभागीय आरोग्य निरीक्षक यांचेमार्फत फिरत्या गाडीतून स्पीकरद्वारे नागरिकांना पाणी कपातीची माहिती देणेत यावी आणि पाणीबचतीचे आवाहन करणेत यावे.
३. आंघोळ, भांडी धुणे व कपडे धुणे यासाठी आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करावा. वाहन धुणे, अंगण किंवा पदपथ स्वच्छ करणे यासाठी बोरिंग अथवा पुणे महानगरपालिकेच्या पाण्याचा वापर करू नये याबाबत सर्व आरोग्य निरीक्षक व मोकदम सेवकांनी त्यांच्या हद्दीमधील नागरिकांमध्ये जनजागृती करावी.

४. खाजगी आणि सार्वजनिक स्विमिंग पूल तसेच खाजगी उद्यानांकरिता पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करण्यात यावा. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी या अनुषंगाने पाहणी करून आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास संबंधितांवर रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

५. खाजगी सोसायट्याना एसटीपी वापर बंधनकारक करणेबाबत मोकदम, आरोग्य निरीक्षक यांचेमार्फत नोटीस देण्यात यावी. तसेच, बंद एसटीपी सुरु करून त्या पाण्याचा पुनर्वापर गार्डनिंग व फ्लशिंगकरिता करणेबाबत कळविण्यात यावे.

६. पाण्याच्या टाक्या ओव्हरफ्लो होणार नाहीत याची दक्षता घ्यावी व आवश्यक असल्यास ऑटोमॅटिक फ्लोट व्हॉल्व्हचा वापर करणेबाबत मोकदम, आरोग्य निरीक्षक यांनी नागरिकांना अवगत करावे. टाकी ओव्हरफ्लो झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर रक्कम रु. १,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

ब. उद्यान विभाग – हॉर्टीकल्चरल मिस्त्री

मनपाच्या उद्यानांकरिता पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करण्यात यावा.

क बांधकाम विकास विभाग – संबंधित उप अभियंता व कनिष्ठ अभियंता

१. कोणत्याही बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरण्यात येऊ नये. त्याकरिता एसटीपीचे पाणी अथवा बोअरवेलचे/विहिरीचे पाणी वापरण्यात यावे. बांधकाम विभागाकडील संबंधित अभियंता यांनी या अनुषंगाने पाहणी करावी. बांधकामाकरिता पिण्याचे पाणी वापरल्याचे आढळून आल्यास तात्काळ सदर बांधकाम थांबविण्यात यावे व संबंधितांवर रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

ड. पाणीपुरवठा विभाग – संबंधित उप अभियंता व कनिष्ठ अभियंता

१. अनधिकृत नळजोड आढळून आल्यास अगर तशी तक्रार प्राप्त झाल्यास पाणीपुरवठा विभागाकडील त्या-त्या भागातील कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत सदर अनधिकृत नळजोडावर कारवाई करण्यात येऊन संबंधिताविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी.

१. कोणत्याही भागात पाण्याची गळती आढळून आल्यास त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.

२. पुणे मनपामार्फत पुरविण्यात येणा-या कोणत्याही टँकरमधून पाण्याची गळती होत नसल्याबाबत खातरजमा क्रावी. असे आढळून आल्यास संबंधित टँकर मालकाविरुद्ध रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी.

**इ. भवन रचना विभाग** - संबंधित उप अभियंता व कनिष्ठ अभियंता

१. मनपा मिळकतीमधील पाण्याच्या गैरवापराबाबत, टाक्या ओव्हरफ्लो होणार नाहीत याबाबत भवन रचना विभागाकडील अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

२. कोणत्याही बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरण्यात येऊ नये. त्याकरिता एसटीपीचे पाणी अथवा बोअरवेलचे/विहिरीचे पाणी वापरण्यात यावे. संबंधित ठेकेदाराने याचे उल्लंघन केल्यास त्यांचे विरुद्ध रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी.

**फ. पथ विभाग** - संबंधित उप अभियंता व कनिष्ठ अभियंता

१. कोणत्याही रस्त्याच्या कामासाठी पिण्याचे पाणी वापरण्यात येऊ नये. त्याकरिता एसटीपीचे पाणी अथवा बोअरवेलचे/विहिरीचे पाणी वापरण्यात यावे. संबंधित ठेकेदाराने याचे उल्लंघन केल्यास त्यांचेविरुद्ध रक्कम रु. १०,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करावी.

कोणत्याही नागरिक/संस्थेविरुद्ध वरीलपैकी कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई दोन वेळा झाल्यास, तिसऱ्या वेळी कोणत्याही प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

प्रत्येक विभागाने या कामी एका नोडल ऑफिसरची नेमणूक करून त्यांच्या विभागाशी संबंधित दैनदिन कार्यवाहीची माहिती पाणीपुरवठा विभागामार्फत आमचेकडे सादर करावी. तसेच, सदर नोडल ऑफिसरचे नाव व मोबाईल क्रमांक याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडे द्यावी.

(पवनीत कौर)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका.

प्रत : १. सर्व खातेप्रमुख,
२. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त,
पुणे महानगरपालिका.
सर्व विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक मोकदम यांना उपरोक्त आदेशाची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात यावे.